# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

## कार्यकारी सारांश

**बहुवर्षीय वीजदर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक कामगिरी चा आढावा, आर्थिक वर्ष २००८-२००९ मधील खर्चाचे अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१०-२०११ करिता वार्षिक महसुली आवश्यकता आणि वीजदर निर्धारणासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे बेस्ट उपक्रमाने सादर केलेली याचिका.**

# कार्यकारी सारांश

## पार्श्वभुमी

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ च्या विनियम १७ प्रमाणे आर्थिक वर्ष २००९-१० चा वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ ची वार्षिक महसुली आवश्यकता व वीजदर प्रस्तावाची याचिका बेस्ट सादर करत आहे. त्याचप्रमाणे महानगारपालिकेच्या लेखापरिक्षकानी लेखापरिक्षित केलेले १एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीचे वार्षिक लेखे आर्थिक वर्ष २००८-०९ च्या उत्पन्न व खर्चाचे अचूक समयोजनाकरिता बेस्ट सादर करत आहे.

सप्टेंबर २००९ पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च विचारात घेतल्यानंतर बेस्टने आर्थिक वर्ष २००९-१० करिता सुधारित एकूण महसुली आवश्यकता अंदाजित केली आहे. आर्थिक वर्ष २००९-१० च्या अंदाजावर आधारीत आर्थिक वर्ष २०१०-११ करीता वार्षिक महसुली आवश्यकतेचा अंदाज केला आहे.

वीजदर विनियमच्या तरतुदीच्या अनुषंगाने ह्या वार्षिक कामगिरी आढाव्याकरिता बेस्टतर्फे खालील माहिती देण्यात येत आहे.

अ. आर्थिक वर्ष २००८-०९ करिता केलेले महसूल व खर्चाचे अचूक समायोजन लेखापरिक्षित लेखांवर आधारीत आहे.

ब. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक १५ जून २००९ च्या आदेशाद्वारे मान्यता दिल्याप्रमाणे बेस्टचा आर्थिक वर्ष २००८-०९ चा महसुल, खर्च आणि कामगिरी यांची केलेली तुलना.

क. आर्थिक वर्ष २००९-१० चे सुधारित अंदाज आणि इतर वास्तविके काळजीपूर्वक विचारांत घेतल्यावर आर्थिक वर्ष २०१०-११ च्या अंदाजाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे.

## आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन

बेस्टच्या लेखापरिक्षीत केलेल्या लेखांच्या आधारे आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन उणे (-) रू. २७.३९ कोटी निश्चित केले आहे. मा. आयोगाने मान्यता दिलेल्यापेक्षा बेस्टचा ऊर्जा खरेदीचा खर्च कमी आहे. आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन तसेच आयोगाने वीजदर आदेशात मंजूरी दिलेल्या खर्चातील प्रत्यक्ष फरक यांच्य ा तुलनेचा सारांश खाली दिला आहे.

**(रक्कम रू.कोटीमध्ये)**

| तपशील | आयोगाच्या मान्यतेनुसार खर्च | बेस्टचा प्रत्यक्ष खर्च | फरक |
|---|---|---|---|
| | (अ) | (ब) | (क) = (अ-ब) |
| ऊर्जा खरेदी खर्च | २३२७.०५ | २२०९.२८ | ११७.७७ |
| प्रवर्तन व परिरक्षण खर्च | २४२.७२ | २५८.७७ | - १६.०५ |
| कर्मचारीय खर्च | १४२.९४ | १५८.६५ | - १५.७१ |
| प्रशासकीय व सर्वसाधरण खर्च | ७२.५१ | ७४.८० | - २.२९ |
| देखभाल आणि दुरूस्ती | २७.२८ | २५.३२ | १.९६ |
| घसाऱ्यासाठी घेतलेल्या अग्रीम रकमेसह घसारा | ४२.७८ | ४३.४ | - ०.६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १४.८३ | ३२.४४ | - १७.६२ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रमाणकानुसार) | ३.९४ | १०.८७ | - ६.९३ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रत्यक्ष प्रमाणकानुसार) | ० | १२.३६ | - १२.३६ |
| वीजग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | १४.१३ | १२.९४ | १.१९ |
| बुडित कर्जे निर्लेखन | ०.०४ | ० | ०.०४ |
| एसएलडीसी शुल्क | ०.७४ | ०.७४ | ० |
| पारेषण अनुज्ञप्तिधारक यांना देय असलेला पारेषण आकार | १०९.६१ | १०६.६१ | ३ |
| स्टॅण्डबाय आकार | १०८.७८ | ११४ | - ५.२२ |
| खर्चातील कपात (डिएसएम) | - ३.३८ | ० | - ३.३८ |
| आकस्मित घटनांसाठी राखीव व साठ्यामध्ये अंशदान | ३.११ | ६.४५ | - ३.३४ |
| इतर खर्च | ० | १०.८७ | - १०.८७ |
| वितरण हानी कमी करण्यासाठी प्रोत्साहन | ० | २५.२३ | - २५.२३ |
| **एकूण खर्च** | **२८६४.३५** | **२८४३.९८** | **२०.३७** |
| रोख्यांवरील परतावा | १००.५३ | १०८.८१ | - ८.२८ |
| अंतर्गत निधीवरील व्याज म्हणून परतावा | ४.९१ | ४.९१ | ० |
| **ढोबळ एकूण महसुली आवश्यकता** | **२९६९.७९** | **२९५७.७०** | **१२.०९** |
| **इतर मिळकत** | **- ५५.५३** | **- ७०.८३** | **१५.३** |
| **निव्वळ वार्षिक महसुली आवश्यकता** | **२९१४.२६** | **२८८६.८७** | **२७.३९** |

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २००८-०९ (रू.कोटी)** | | |
|---|---|---|---|
| | **आयोगाच्या मान्यतेनुसार** | **बेस्टचे वास्तविक** | **फरक** |
| | **(अ)** | **(ब)** | **(क) = (ब-अ)** |
| **निव्वळ वार्षिक महसुली आवश्यकता** | **२९१४.२६** | **२८८६.८७** | **- २७.३९** |
| ऊर्जा विक्रिमुळे महसूल | २८३२.२८ | २८३२.२८ | ०.०० |
| **आर्थिक वर्ष ०८-०९ च्या महसूलातील फरक** | **८१.९८** | **५४.५९** | **- २७.३९** |

## <u>आर्थिक वर्ष २००९-१० चे तातपुरत्या स्वरुपाचे अचूक समायोजन</u>

सप्टेंबर २००९ पर्यंत प्रत्यक्ष देखभाल खर्च, ऊर्जा खरेदी, विक्री आणि भांडवली खर्च विचारात घेऊन वित्तीय वर्ष २००९-१० करिता तात्पुरत्या स्वरुपातील समायोजन अंदाजित केले आहे.

आर्थिंक वर्ष २००९-१० साठी आयोगाने मान्यता दिलेली वार्षिक महसुली आवश्यकता आणि सप्टेंबर, २००९ पर्यंतच्या खर्च आकारणीवर आधारित आर्थिक वर्ष २००९-१० साठीचा अंदाज आणि त्यानुसार येणारा फरक खालील तक्त्यात दिला आहे.

**वित्तीय वर्ष २००९-१० साठीच्या वार्षिकमहसुली आवश्यकतेची गणना**

**(रु.कोटींमध्ये)**

| तपशील | आयोगाने वित्तीय वर्ष २००९-१०करिता दिलेली मान्यता | बेस्टने वित्तीय वर्ष २००९-१० करिता दिलेले अंदाज | फरक |
|---|---|---|---|
| | (अ) | (ब) | (क) = (अ-ब) |
| ऊर्जा खरेदी खर्च | १४७७.५६ | १७८४.२२ | - ३०६.६६ |
| प्रवर्तन व परिरक्षण खर्च | २५८.९७ | २७९.३६ | - २०.३९ |
| कर्मचारीय खर्च | १५३.३९ | १७०.४५ | -१७.०६ |
| प्रशासकीय व सर्वसाधरण खर्च | ७६.८९ | ७९.३९ | -२.५ |
| देखभाल आणि दुरूस्ती | २८.६९ | २९.५२ | -०.८३ |
| घसाऱ्यासाठी घेतलेल्या अग्रीम रकमेसह घसारा | ४५.३ | ४६.५६ | - १.२६ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १९.४२ | १९.१७ | ०.२५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रमाणकानुसार) | ८.१४ | १२.९७ | - ४.८३ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज (प्रत्यक्ष प्रमाणकानुसार) | ० | ८.०४ | - ८.०४ |
| वीजग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | १५.५४ | १२.४६ | ३.०८ |
| बुडित कर्जे निर्लेखन | ०.०४ | ०.१५ | - ०.११ |
| एसएलडीसी शुल्क | ०.५३ | ०.५३ | ० |
| टीपीसीची कमी झालेली वसूली | ० | ० | ० |
| पारेषण अनुज्ञप्तिधारक यांना देय असलेला पारेषण आकार | ९१.३८ | ९१.३८ | ० |
| स्डॅण्डबाय आकार, (राखीव आकार.) | ११२.१३ | ११२.१३ | ० |
| आकस्मित घटनांसाठी राखीव व साठ्यामध्ये अंशदान | ३.२८ | ७.१८ | - ३.९ |
| इतर खर्च | ० | ५६.२६ | - ५६.२६ |
| वितरण हानी कमी करण्यासाठी प्रोत्साहन | ० | ० | ० |
| **एकूण खर्च** | **२०३२.२९** | **२४३०.४०** | **- ३९८.११** |
| रोख्यांवरील परतावा | १०३.४१ | ११४.६६ | - ११.२५ |
| अंतर्गत निधीवरील व्याज म्हणून परतावा | ५.२१ | ५.१९ | ०.०२ |
| **एकूण महसुली आवश्यकता** | **२१४०.९१** | **२५५०.२५** | **- ४०९.३४** |
| इतर जमा | - ५५.५३ | - ७१.१५ | १५.६२ |
| **निव्वळ वार्षिक महसुली आवश्यकता** | **२०८५.३८** | **२४७९.१०** | **- ३९३.७२** |

## आर्थिक वर्ष २००९-१० करिता एकूण वार्षिक महसुली आवश्यकतेतील फरकाची गणना

| तपशील | वित्तीय वर्ष २००९-२०१० (रू. कोटीत) | | |
|---|---|---|---|
| | आयोगाने दिलेली मान्यता | वित्तीय वर्ष २००९-१० करिता अंदाजित | प्रत्यक्ष खर्च |
| | (अ) | (ब) | (क) = (अ-ब) |
| **एकूण महसुली आवश्यकता** | **२०८५.३८** | **२४७९.१०** | **- ३९३.७२** |
| आर्थिक वर्ष २००७-०८ महसुलातील फरक | २२५.७९ | २२५.७९ | ० |
| आर्थिक वर्ष २००९-१० महसुलातील फरक | ३९२.२२ | ४३०.९८ | - ३८.७६ |
| **निव्वळ एकूण महसूली आवश्यकता** | **२७०३.३९** | **३१३५.८७** | **- ४३२.५** |
| उर्जा विक्रीतून मिळणारा महसूल | २७०४.९९ | २६९९.५० | ५.४९ |
| अधिक - इंधन समायोजन आकाराच्या विक्रितून मिळणारा अंदाजे महसूल | | २००.८७ | - २००.८७ |
| आर्थिक वर्ष २००९-१० चा एकूण अंदाजे महसुल | २७०४.९९ | २९००.३७ | - १९५.३८ |
| **आर्थिक वर्ष २००९-१० करिता महसुलातील फरक** | **- १.६०** | **२३५.५०** | **- २३७.१०** |

## आर्थिक वर्ष २०१०-११ करिता अंदाज

आर्थिक वर्ष २००९-२०१० चा अंदाज आणि इतर वस्तुस्थिती लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०१०-११ ची सुधारित वार्षिक महसुली आवश्यकता खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे वस्तुस्थितीवर आधारित अंदाजानुसार अंदाजित खर्च आणि प्रचलित वीजदराने आकारणी केल्यास महसुलामध्ये येणारा फरक खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

## वित्तीय वर्ष २०१०-११ वार्षिक महसुली आवश्यकतेची गणना

| तपशील | आर्थिक वर्ष २०१०-११ करिता बेस्टचा अंदाज (रू. कोटीमध्ये) |
|---|---|
| उर्जा खरेदीचा खर्च | २०१४ |
| प्रवर्तन व परिक्षण खर्च | ३०१.११ |
| कर्मचारीय खर्च | १८२.८४ |
| प्रशासकीय व सर्वसाधरण खर्च | ८४.१५ |
| देखभाल आणि दुरूस्ती | ३४.१२ |
| घसाऱ्यासाठी घेतलेल्या अग्रीम रकमेसह घसारा | ४७.२५ |
| दीर्घ मुद्तीच्या भांडवलावरील व्याज | ३०.१२ |
| खेलत्या भांडवलावरील व्याज (प्रमाणकानुसार) | ५.७२ |
| खेलत्या भांडवलावरील व्याज अतिरिक्त | ५.७३ |
| वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | १५.७७ |
| बुडित कर्ज निर्लेखन | ०.१५ |
| एस एल डी सीचे शुल्क | १.१४ |
| पारेषण अनुज्ञप्तिधारक यांना देय असलेला पारेषण आकार | ९५.९ |

| | |
|---|---|
| स्डॅण्डबाय आकार | ११२.१३ |
| आकस्मित घटनांसाठी राखीव व साठ्यामध्ये अंशदान | ७.८७ |
| इतर खर्च | ५७.२६ |
| **एकूण खर्च** | **२६९४.१३** |
| रोख्यांवरील परतावा | १२१.५ |
| अंतर्गत निधीवरील व्याज म्हणून परतावा | ५.७९ |
| **एकूण महसुली आवश्यकता** | **२८२१.४२** |
| इतर मिळकत | - ७१.४९ |
| **निव्वळ वार्षिक महसुली आवश्यकता** | **२७४९.९३** |

## फक्त आर्थिक वर्ष २०१०-११ करिता महसुलातील फरकाची गणना

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २०१०-११ (रू. कोटीमध्ये)** |
|---|---|
| **निव्वळ वार्षिक महसुली आवश्यकता** | **२७४९.९३** |
| उर्जा विक्रिमुळे महसूल | २७९७.७४ |
| **आर्थिक वर्ष २०१०-११ च्या महसूलातील फरक** | **- ४७.८१** |

## ऊर्जा खरेदी

टीपीसी(जी) कडून मुख्यत: बेस्ट उर्जा खरेदी करतो. आर्थिक वर्ष २००९-१०चा सुधारीत ऊर्जा खरेदीचा खर्च आणि आर्थिक वर्ष २०१०-११च्या वास्तविक अंदाजाचा सारांश खाली दिला आहे.

**ऊर्जा खरेदी खर्चाची सांराश**

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २००९-१० करिता बेस्टचा सुधारीत अंदाज** | | **युनिट दर** | **आर्थिक वर्ष २०१०-११ करिता बेस्टचा सुधारीत अंदाज** | | **युनिट दर** |
|---|---|---|---|---|---|---|
| | एमयु | रू कोटी | रू./युनिट | एमयु | रू कोटी | रू./युनिट |
| टीपीसी (जी) -युनिट न.४ व जलविद्युत औष्णिक उर्जा | ४५५९ | १५३६ | ३.३७ | ४७१६ | १६६९ | ३.५४ |
| टीपीसी(जी) युनिट नं.-८ | ६२२ | २०९ | ३.३६ | ६७८ | २३९ | ३.५३ |
| टीपीसी(जी) चा स्थिर आकार | | ३२५ | | ० | ३६९ | ०.०० |
| नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोत | १९५ | ८८ | ४.५२ | १०५ | ४५ | ४.२८ |
| अतिरिक्त उर्जा खरेदी | १८८ | १०३ | ५.४६ | | | |
| बेस्टच्या उर्जेच्या भागाची विक्री | - ७०२ | - ४७५ | ६.७६ | - ४५३ | - २६८ | ५.९१ |
| स्डॅण्डबाय आकार | | ११२ | | | ११२ | |
| वजा: हायडल सुट | | - ४० | | | - ४० | |
| **एकूण खर्च (उर्जा खरेदी)** | **४८६२** | **१८५९** | **३.८२** | **५०४६** | **२१२६** | **४.२१** |
| पारेषण आकार | | ९१ | | | ९५.९ | |
| एसएलडीसी आकार | | ०.५३ | | | १.१४ | |
| बाब क्र.१११ , २००८प्रमाणे प्रदान | | ३१ | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (आयोगाच्या २८ मे २००९ च्या आदेशानुसार) | | | | | | |
| टीपीसी(जी) कडून मिळालेले क्रेडीट | | - १.४६ | | | | |
| बाब क्र.२६ , २००८ नुसार परतावा (आयोगाच्या २ फेब्रुवारी २००९ च्या आदेशानुसार) | | ७.८६ | | | | |
| **एकुण संपुर्ण खर्च** | **४८६२** | **१९८८** | **४.०९** | **५०४६** | **२२२३** | **४.४१** |

## ऊर्जा ताळेबंद

बेस्टने आर्थिक वर्ष २००८-०९, आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठी ऊर्जा विक्रीचा अंदाज, पारेषण आणि वितरण हानीच्या आधारावर उर्जेच्या ताळेबंदाची संगणना केली आहे. आर्थिक वर्ष २००९-१० आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठी प्रमाणकानुसार ४.८५% राज्यस्तरीय पारेषण हानी बेस्टने विचारात घेतली आहे. आर्थिक वर्ष २००९-१० साठी बेस्टने वितरण हानी १०% विचारात घेतली आहे जी मा. आयोगाने मान्य केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार आहे. ऊर्जेच्या ताळेबंदासाठी बेस्टने आर्थिक वर्ष २०१०-११ साठी १०% वितरण हानी विचारात घेण्याचे प्रस्तावित केले आहे.

संपूर्ण तीन वर्षाचा ऊर्जेचा ताळेबंद खालील तक्त्यामध्ये दिला आहे.

**बेस्टचा ऊर्जेचा ताळेबंद**

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २००८-०९ करिता प्रत्यक्षात** | **आर्थिक वर्ष २००९-१० करिता सुधारीत अंदाज** | **आर्थिक वर्ष २०१०-११ करिता अंदाज** |
|---|---|---|---|
| ऊर्जा विक्री (एमयु) | ४१०३ | ४१६४ | ४३२१ |
| वितरण हानी (%) | ९.२९% | १०% | १०% |
| ऊर्जा खरेदी (एमयु) टी ॲन्ड डी इन्टरफेज | ४५२३ | ४६२७ | ४८०१ |
| पारेषण हानी (%) | ४.८६% | ४.८५% | ४.८५% |
| ऊर्जा खरेदी (एमयु) जी ॲन्ड टी इन्टरफेज | ४७५४ | ४८६२ | ५०४६ |

## विक्रीचा अंदाज

आर्थिक वर्ष २००९-१० :

आर्थिक वर्ष २००९-१० पहिल्या सहामाहीमधील प्रत्यक्ष विक्री बेस्टने विचारात घेतली आहे. मागिल आर्थिक वर्ष २००८-०९ च्या वार्षिक कामगिरीचा आढाव्याच्यावेळी अंगिकारण्यात आलेली पध्दत, आर्थिक वर्ष २००९-१० च्या दूसऱ्या सहामाहीच्या विक्रीच्या अंदाजासाठी घेण्यात आली आहे. एकूण वार्षिक ऊर्जेची खरेदी हा पाया घेऊन त्याची तुलना मधील १५ वर्षाच्या अनुभवावरून महिन्याच्या सरासरी ऊर्जेच्या आदानाशी गणना करण्यात आली आहे, विशिष्ट महिन्यात खरेदी केलेली ऊर्जा आणि त्याच महिन्यातील ऊर्जा विक्रीचे एकूण परिणाम ह्यांच्या टक्केवारीचा कल सारखाच असेल असे गृहीत धरून आर्थिक वर्ष २००९-१० च्या दुसऱ्या सहा महिन्यांचा अंदाज करण्यात आला आहे.

**आर्थिक वर्ष २०१०-११**

आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये करण्यात आलेली वाढ ही पाच वर्षातील ३.७७% एवढा सीएजीआर (CAGR) विचारात घेऊन केलेली आहे. एकूण विक्रीचा अंदाज पुढीलप्रमाणे आहे.

| तपशील | प्रत्यक्षात | सुधारीत अंदाज | अंदाज |
|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २००८-०९ | आर्थिक वर्ष २००९-१० | आर्थिक वर्ष २०१०-११ |
| बेस्टची एकुण उर्जा विक्री (एमयु) | ४१०३ | ४१६४ | ४३२१ |

**वितरण हानी मधील घट प्रोत्साहन गणना**

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बहुवार्षिय वीजदर चौकटीत अंतर्गत प्रस्तावित केलेल्या १०.५% मानकाच्या तुलनेत बेस्टने वितरण हानीची पातळी ९.२९% एवढी आर्थिक वर्ष २००८-०९ करीता साध्य केली आहे.
- ९.२९% एवढी निम्न वितरण हानी मान्यता दिल्यापेक्षा १.२१% कमी आहे ज्यामूळे रू.३७.८४ कोटी एवढा महसुल असून जो मा. आयोगाने दिलेल्या पध्दती प्रमाणे आहे.
- आर्थिक वर्ष २००८-०९ च्या अचूक समायोजनेमध्ये प्रोत्साहन म्हणून रू.२५.२३कोटी (रू.३७.८४ कोटीच्या २/३) कोटी मागण्यात आले आहेत.
- ह्या रकमेपैकी रू.१२.६१ कोटी बेस्टकडे ठेऊन घेण्यात येतील, आणि उर्वरीत रू.१२.६१ कोटी विशेष राखीव निधीमध्ये जमा करण्यात येतील.

**आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसूलातील फरकाचा सारांश**

आर्थिक वर्ष २००८-०९ मधील आवश्यक अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० करिता तात्पुरते समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठी अंदाजित फरक ह्या पायावर बेस्टच्या महसुलातील तूट रू. १७३.८५ कोटी एवढी आहे.

| अनु. क्र. | तपशील | रू. कोटीमध्ये | (%) |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक वर्ष २००८-०९ करिता खर्चाचे अचुक समायोजन | -२७.३९ | -०.९८% |
| २ | आर्थिक वर्ष २००९-१० करिता खर्चाचे अंदाजित समायोजन | २३७.१० | ८.४७% |
| ३ | आर्थिक वर्ष २०१०-११ करिता महसुलातील फरक | -४७.८१ | -१.७१% |
| ४ | बाब क्र.४४, २००९ च्या पुरर्निलोकीत आदेशाचा परिणाम | ११.९५ | ०.४३% |
| **५** | **एकुण महसुलातील फरक (+/-)** | **१७३.८५** | **६.२१%** |

**वीजदर पत्रक**

मा. आयोगाने दिनांक १५ जून, २००९ च्या मागील वीजदरपत्रक आदेशामध्ये दिलेल्या अंदाजित विक्री आणि ग्राहकांसंबंधी माहितीचे विलग्नीकरणाला प्रचलित वीजदर लावल्यानंतर आर्थिक वर्ष २०१०-११ च्या

अपेक्षित महसुलाचा अंदाज दिला आहे. वर दिलेल्या तक्त्यामध्ये आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीजदरा अन्वये रू.१७३.८५ कोटी बेस्टच्या महसुलातील फरक वसूल करण्यासाठी ६.२१ टक्क्यांची वाढ प्रचलीत वीजदरामध्ये करावी लागेल. मा. आयोगाकडे बेस्ट नम्रपणे सादर करू इच्छित आहे की आर्थिक वर्ष २०१०-११ साठीच्या प्रस्तावित वीजदर ठरविताना खालील मुद्दे बेस्टने विचारात घेतले आहेत.

१. निवासी प्रवर्गात ३०० युनिटस् पर्यत कोणतीही वाढ प्रस्तावित नाही.

२. कोणत्याही प्रवर्गसाठी मागणी आकारामध्ये वाढ प्रस्तावित केलेली नाही.

३. औद्योगिक प्रवर्गातील उच्च वापर असणाऱ्या ग्राहकांच्या ऊर्जेच्या दरामध्ये वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे.

४. विद्युत अधिनियम २००३, वीजदर धोरण आणि आयोगाच्या मागिल आदेशाप्रमाणे बेस्टच्या वीजदरामध्ये प्रस्तावित बदल केलेले आहेत.

प्रचलित दरांसोबत प्रस्तावित दर पत्रक आणि त्यांची तुलना खाली दिलेली आहे.

मा. आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या प्रपत्रांपेकी, प्रपत्र १४ मध्ये तपशीलवार महसुलाची गणना देण्यात आली आहे.

| वीजदर प्रवर्ग | युनिट टप्पा | विद्युत दराचे भाग | | | विद्युत दराचे भाग | | | वीजदरांमधील वाढ (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सिंगल/ थ्री फेज मीटर (रु./ जोडणी महिना) | मागणी आकार (रु./ केवीए/ महिना) | बदलता आकार (रु./ केडबल्यु एच / | सिंगल/ थ्री फेज मीटर (रु./ जोडणी महिना) | मागणी आकार (रु./ केवीए/ महिना) | बदलता आकार (रु./ केडबल्यु एच / | | |
| | | प्रचलित दर | | | प्रस्तावित दर | | | मागणी आकार | बदलता आकार |
| बीपीएल | ०-३० | ३ | | ०.४ | ३ | | ०.४ | ०% | ०% |
| | | | | | | | | | |
| एलटी-१ | ०-१०० | ३० | | १.८ | ३० | | १.८ | ०% | ०% |
| | १०१-३०० | ५०व १०० | | ३.७ | ५०व १०० | | ३.७ | ०% | ०% |
| | ३०१-५०० | ५०व १०० | | ५.९ | ५०व १०० | | ६.८ | ०% | १५% |
| | >५०० | १०० | | ७.९ | १०० | | ९.२ | ०% | १६% |
| | | | | | | | | | |
| एलटी-२ अ | ०-३०० | २०० | | ५.१ | २०० | | ५.५ | ०% | ८% |
| | ३०१-५०० | २०० | | ६.८ | २०० | | ७.१५ | ०% | ५% |
| | ५०१-१००० | २०० | | ७.९ | २०० | | ८.५ | ०% | ८% |
| | >१००० | २०० | | ८.३ | २०० | | ९.२ | ०% | ११% |
| | | | | | | | | | |
| एलटी-२ बी | सर्व युनिटस् | | १५० | ८.९ | | १५० | ९.३ | ०% | ४% |
| | | | | | | | | | |
| एलटी-२ सी | सर्व युनिटस् | | १५० | ९.८ | | १५० | १०.३ | ०% | ५% |
| | | | | | | | | | |
| एलटी-३ | ०-३०० | २५० | | ४.३ | २५० | | ४.३ | ०% | ०% |
| | ३०१-५०० | ३०० | | ५.८ | ३०० | | ५.८ | ०% | ०% |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५०१-१००० | ३५० | | ६.६ | ३५० | | ६.६ | ०% | ०% |
| | > १००० | ३५० | | ७.५ | ३५० | | ८.३५ | ०% | ११% |
| | | | | | | | | | |
| एलटी-४ अे | सर्व युनिटस | | १५० | ७.१९ | | १५० | ७.५ | ०% | ४% |
| | | | | | | | | | |
| एलटी-४ बी | सर्व युनिटस | | १५० | ७ | | १५० | ७.२५ | ०% | ४% |
| एलटी-५ | सर्व युनिटस | ३०० | | १२.९२ | ३०० | | १४ | ०% | ८% |
| एलटी-६ | सर्व युनिटस | | १५० | ६.०९ | | १५० | ६.२ | ०% | २% |
| एलटी-७ अ | सर्व युनिटस | १५० | | २.८५ | १५० | | ३ | ०% | ५% |
| एलटी-७ बी | सर्व युनिटस | १५० | | १०.५९ | १५० | | १०.५९ | ०% | ०% |
| एलटी-८ | सर्व युनिटस | १०० | | २.६६ | १०० | | २.६६ | ०% | ०% |
| | | | | | | | | | |

## प्रचलित आणि प्रस्तावित निम्नदाब वीजदर पत्रकाची तुलना

**टिप: टिओडी दराच्या अटी आणि शर्ती दरामध्ये कोणताही बदल नाही.**

**प्रचलित आणि प्रस्तावित उच्चदाब विद्युत दरांची तुलना**

| वीजदर प्रवर्ग | युनिट टप्पा | विद्युत दराचे भाग | | | विद्युत दराचे भाग | | | वीजदरांमधील वाढ (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सिंगल/ थ्री फेज मीटर (रु./ जोडणी महिना) | मागणी आकार (रु./ केवीए/ महिना) | बदलता आकार (रु./ केडबल्यु एच / | सिंगल/ थ्री फेज मीटर (रु./ जोडणी महिना) | मागणी आकार (रु./ केवीए/ महिना) | बदलता आकार (रु./ केडबल्यु एच / | | |
| | | प्रचलित दर | | | प्रस्तावित दर | | | मागणी आकार | बदलता आकार |
| एचटी-१ | सर्व युनिटस | | २०० | ५.८१ | | २०० | ६.४ | ०% | १०% |
| एचटी-२ | सर्व युनिटस | | २०० | ६.३६ | | २०० | ६.३६ | ०% | ०% |
| एचटी-३ | सर्व युनिटस | | २०० | ३.६१ | | २०० | ४.१ | ०% | १४% |
| एचटी-४ | सर्व युनिटस | | २०० | ९ | | २०० | ९ | | ०% |

**टिप: टिओडी दराच्या अटी आणि शर्ती दरामध्ये कोणताही बदल नाही.**

### वित्तीय वर्ष २०१०-११ साठी प्रस्तावित केलेल्या वीजदरानुसार वेगवेगळ्या ग्राहक प्रवर्गातील आंतर अर्थसहाय्य

| वीजग्राहक प्रवर्ग | टप्पा | वित्तीय वर्ष २०१०-११ करीता सरासरी अंदाजित वीज | सरासरी देयक दर (रू./ केडब्लु एच) | | सरासरी देयक दर आणि सरासरी अंदाजित वीज पुरवठ्याचा खर्च यांचे प्रमाण (%) | | | सरासरी देयकानुसार वीजदरातील वाढ % मध्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रचलीत वीजदर | प्रस्तावित वीजदर | वित्तीय वर्ष ०९ करीता वार्षिक | प्रचलीत वीजदर | प्रस्तावित वीजदर | |

| | | पुरवठ्याचा खर्च (रू./ केडब्लु एच) | | | कामगिरीच्या आढाव्याच्या आदेशानुसार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एलटी प्रवर्ग** | | | | | | | | |
| एलटी -१ बीपीएल | ०-३० | | ०.५० | ०.५० | **१९%** | ७% | ७% | ०% |
| एलटी-१ निवासी | सर्व युनिटस् | | ४.४१ | ४.७९ | **६७%** | ६४% | ७०% | ९% |
| एलटी-२ अे वाणिज्य २० केडब्ल्यु पर्यत | सर्व युनिटस् | ६.८८ | ७.३२ | ७.८९ | **११५%** | १०६% | ११५% | ८% |
| एलटी-२ बी वाणिज्य > २० केडब्ल्यु आणि <= ५० केडब्ल्यु पर्यत | सर्व युनिटस् | | ९.३८ | ९.७८ | **१४९%** | १३६% | १४२% | ४% |
| एलटी-२सी वाणिज्य >५० केडब्ल्यु | सर्व युनिटस् | | १०.३२ | १०.८२ | **१६३%** | १५०% | १५७% | ५% |
| एलटी-३ औद्योगिक २० केडब्ल्यु पर्यत | सर्व युनिटस् | | ६.७४ | ७.०१ | **१०६%** | ९८% | १०२% | ४% |
| एलटी-४ अे औद्योगिक > २० केडब्ल्यु आणि <= १०० केडब्ल्यु पर्यत | सर्व युनिटस् | | ७.८७ | ८.१८ | **१२५%** | ११४% | ११९% | ४% |
| एलटी-४ बी औद्योगिक > १०० केडब्ल्यु पर्यत | सर्व युनिटस् | | ७.४७ | ७.७२ | **११८%** | १०९% | ११२% | ३% |
| एलटी-५ जाहिराती आणि सुचना फलक | सर्व युनिटस् | | १३.७४ | १४.८२ | **२१४%** | २००% | २१५% | ८% |
| एलटी-६ रस्त्यावरील दिवे | सर्व युनिटस् | | ६.७९ | ६.९० | **१०४%** | ९९% | १००% | २% |
| एलटी-७ अे तात्पुराता धार्मिक | सर्व युनिटस् | | २.८९ | ३.०४ | **४५%** | ४२% | ४४% | ५% |
| एलटी- ७ बी इतर तात्पुरता | सर्व युनिटस् | | १०.६२ | १०.६२ | **१६८%** | १५४% | १५४% | ०% |
| एलटी- ८ दहन आणि दफन भुमी | सर्व युनिटस् | | २.६७ | २.६७ | **४२%** | ३९% | ३९% | ०% |
| **एचटी प्रवर्ग** | | | | | | | | |
| एचटी-१ औद्योगिक | सर्व युनिटस् | | ६.३१ | ६.९० | **१०१%** | ९२% | १००% | ९% |
| एचटी -२ वाणिज्य | सर्व | ६.८८ | ६.९२ | ६.९२ | **१०९%** | १०१% | १०१% | ०% |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | युनिटस् | | | | | | | |
| एचटी -३ निवासी संकुल | सर्व युनिटस् | | ४.३२ | ४.८१ | **६९%** | ६३% | ७०% | ११% |

**<u>विनंती</u>**

मा. आयोगाला बेस्ट उपक्रमातर्फे विनंती करण्यात येते की,

अ. आर्थिक वर्ष २०१०-११ करीता एकूण वसूली, आर्थिक वर्ष २००९-१०च्या प्रस्तावीत रकमेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००८-०९ च्या रकमेचे अचूक समायोजन आणि बेस्टने केलेले इतर दावे मान्य करण्यात यावे.

ब. आर्थिक वर्ष २०१०-११ करीता प्रस्तावीत प्रवर्ग-सूचीतील वीजदर वाढ मान्य करण्यात यावी.

क. आर्थिक वर्ष २०१०-११ करीता १० टक्के एवढी मर्यादा वितरण हानी करिता विचारात घ्यावी.

ड. बेस्टने विनंती केल्याप्रमाणे वीजदरांच्या तत्वप्रणाली करिता केलेल्या सूचनांना मान्यता देण्यात यावी.

ई. कोणत्याही चुका/ त्रुटी बद्दल कृपया सुट देण्यात यावी आणि यात सुधारणा करण्याचीसंधी देण्यात यावी.

फ. अतिरीक्त विवरण/माहिती आवश्यक असल्यास बेस्टला अर्ज करण्यास परवानगी देण्यात यावी.